नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 02/09/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## एटीएम कार्डची हातचालीखीने अदलाबदली करून एटीएम मधुन पैसे काढणाऱ्यास पोलीसांनी केले जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कार्यवाही

नागपूर ग्रामीण जिल्हयात मागील काही महिन्यांपासुन होत असलेल्या वयोवृध्द लोकाची एटीएम कार्ड ची हातचलाखीने आदलाबदली करून एटीएम मशीन मधून पैशे काढून फसणूक केल्याबाबत नागपूर ग्रामिण अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला कलम 420 भादवि अन्वये गून्हे दाखल असून सदर गून्हयाचे अनूषंगाने आरोपीचा शोध घेवून गून्हे उघडकीस आणणे करिता मा.पोलीसा अधिक्षक सा.नाग्रा यांनी दिलेल्या आदेशानूसार मा. पो.नि. श्री. अनिल जिट्टावार, स्था गु शा ना ग्रा यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक 01/09/2020 रोजी स्था. गु.शा नागपूर ग्रामीण चे पथक पेट्रोलींग करीत असता गूप्त माहीतगाराव्दारे खात्रीशीर खबर मिळालेल्या माहितीनुसार पोलीसांनी नामे मयूर अनिल कायरकर यास आकाशवाणी चौक नागपूर येथुन ताब्यात घेवुन त्यास सखोल विचारपुस केली असता आरोपीने उमरेड, कन्हान, सावनेर, कळमेश्वर, कुही, खापखेडा, पारशिवनी इत्यादी ठिकाणी जावुन एटीएम मध्ये लोकांचे एटीएम कार्ड हातचलाखीने आदलाबदली करून एटीएम मधून पैसे काढले याकामात आरोपीचा मित्र अनूप पजारे रा.अजनी, नागपूर हा त्याला मदत करीत होता. आरोपीने पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत 05 गुन्हे, कन्हान अंतर्गत 05 गुन्हे, सावनेर अंतर्गत 02 गुन्हे, पारशिवनी – 01, कुही – 01, खापरखेडा – 01 गुन्हा, कळमेश्वर – 01 गुन्हा इत्यादी एकुण 16 गुन्हयामध्ये मोठयाप्रमाणावर लाखोच्यासंख्येत रक्कम काढल्याची कबुली दिली.

आरोपी हा त्याच्या मित्रा सोबत एटीएम मशिन जवळ जावुन वयोवृध्द इसमांना हेरून मदत करण्याच्या बहान्याने त्यांचेकडुन एटीएम कार्ड घेत असत व एटीम कार्ड परत करतांना आपल्याकडील त्या सारखा दिसनारा दुसरा एटीएम कार्ड संबंधीतास परत करत असत. व हातचालाखीने घेतलेल्या एटीएम कार्डने दुसऱ्या एटीएम मशिनमधुन पैसे काढत असत. त्यामुळे काही वृध्दांनी आपल्या वृध्दापकाळाचा आधार म्हणुन बॅंकेच्या खात्यात जी रक्कम ठेवलेली होती. त्या रक्कमेवरच हा आरोपी डल्ला मारत होता. आरोपीचा मित्र अनुप पजारे रा. नागपूर याचा शोध सुरू असुन लवकरच त्यालाही अटक केली जाईल.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, जावेद शेख, सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार संतोष पंढरे, मदन आसतकर, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, बालाजी साखरे, राधेश्याम कांबळे, चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते तसेच सायबर शाखेतील पोलीस शिपाई सतिश राठोड व महिला पोलीस नायक स्नेहलता ढवळे यांनी पार पाडली.

जनतेस आव्हान :– लोकांनी एटीएम मधुन पैसे काढतांना सावधगिरी बाळगणे आवश्यक असुन पैसे काढतेवेळी आपल्या मागे कोणी आपल्या एटीएम कार्डचे पासवर्ड बघत तर नाही नं याची खात्री करून घ्यावी. तसेच आपला पिन नंबर इतरांना सांगुन नये. अनोळखी इसमांची मदत घेवुन पैसे काढु नये. असे नागपूर ग्रामीण पोलीसांकडुन आपणास आव्हान करण्यात येत आहे. याप्रकारे कुणाची फसवणुक झाली असल्यास नागपूर ग्रामीण पोलीसांशी संपर्क करावा.





. अटक आरोपी व मुद्देमालसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर